31 MAY 2023

क्रांतीसिंह

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात मत्स्यालय, जल-जैवविविधता केंद्र साकारणार

कोल्हापूर(प्रतिनिधी):- दापोली (जि. रत्नागिरी) येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठासमवेत शिवाजी विद्यापीठाचा अध्यापन, संशोधन व विस्तार कार्यासाठी सामंजस्य करार झाला. या करारान्वये शिवाजी विद्यापीठात मत्स्यालय आणि जल-जैवविविधता केंद्र साकारण्यासाठी कृषी विद्यापीठासह त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयांचे सहकार्य लाभणार आहे.

शिवाजी विद्यापीठातील जलस्रोतांमध्ये (विद्यापीठ परिसरातील तळी) विविध प्रकारचे मासे, जलचर यांचे संवर्धन करणे, ज्यायोगे तळ्यातील पाणी निसर्गत: स्वच्छ राहील आणि पाण्यामधील अन्नसाखळी समृद्ध होईल, या दृष्टीने डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाशी संलग्नित मत्स्यविज्ञान महाविद्यालयाचे (रत्नागिरी) सहकार्य आणि मार्गदर्शन विद्यापीठास लाभणार आहे. कृषी विद्यापीठ यांच्याकडून तांत्रिक मार्गदर्शन लाभणार आहे.

कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी यावेळी कृषी विद्यापीठ व अकृषी विद्यापीठांमध्ये होणारा हा सामंजस्य करार वेगळ्या स्वरुपाचा असून दोन्ही विद्यापीठांतील सर्व घटकांच्या संशोधनात्मक व शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी निश्चितपणे उपयुक्त ठरेल, अशी भावना व्यक्त केली. या सामंजस्य करारामुळे वन्यविज्ञान महाविद्यालय, दापोली व औषधी वनस्पतींवर संशोधन करणाऱ्या कृषी विद्यापीठातील संशोधकांना शिवाजी विद्यापीठातील समृद्ध उपकरण कक्ष, प्रयोगशाळा व संशोधकांच्या ज्ञानाचा लाभ होईल, असे मत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय सावंत यांनी ऑनलाईन उपस्थित राहून व्यक्त केले. या करारावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, प्राणिशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. आशिष देशमुख, डॉ. अधिकराव जाधव उपस्थित होते. तर कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय सावंत, संशोधन संचालक डॉ. भावे, मत्स्यविज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता प्रा. शिंगारे, वनशास्त्र महाविद्यालय दापोलीचे डॉ. अजय राणे ऑनलाईन उपस्थित होते. डॉ. मानसिंगराज निंबाळकर यांनी आभार मानले.

**औषधी वनस्पतींच्या पुनरूज्जीवनासाठी सहकार्य-** शिवाजी विद्यापीठातर्फे डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ यांच्या संशोधकांना औषधी वनस्पतींचे जैवरासायनिक पृथ:क्करण, औषधी वनस्पती तसेच जंगलात आढळणाऱ्या पण संख्येने कमी प्रमाणात असणाऱ्या वनस्पतींचे टिश्यू कल्चरद्वारे पुनरूज्जीवन करण्यासाठी सहकार्य व मार्गदर्शन लाभणार आहे. भविष्यात दोन्ही विद्यापीठांच्या सहचर्याने विविध कार्यशाळा, व्याख्याने, चर्चासत्रे यांचे आयोजन केले जाणार आहे.

लोकमत

# विद्यापीठात 'शास्त्रीय गायन' कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे २९ व ३० मे रोजी आयोजित केलेली 'शास्त्रीय गायन' कार्यशाळा उत्साहात पार पडली. या कार्यशाळेसाठी प्रसिद्ध शास्त्रीय गायिका वंदना आठले यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रसिद्ध युवा गायिका चिन्मयी आठले-ओक उपस्थित होत्या. या कार्यशाळेमध्ये अहिर भैरव, गावती, हंसध्वनी, बिहाग आदी रागातील विविध बंदिशी, त्यांची गायकी, आकृत्यांची उकल, मुखड्यांचे सौंदर्य, बंदिशीच्या अंगाने रागाची मांडणी, रियाजाच्या पद्धती यावर वंदना आठले व चिन्मयी आठले- ओक यांनी मार्गदर्शन केले. डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी प्रास्ताविक केले, तर अतुल परीट यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. यावेळी डॉ. अंजली निगवेकर, डॉ. निखिल भगत, प्रशांत देसाई, आदी उपस्थित होते.

लोकमत

# आर्थिक फसवणुकीस अर्थ निरक्षरता कारणीभूत

## डॉ. विजय ककडे यांचे प्रतिपादन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : आजच्या धावपळीच्या जीवनात नागरिकांच्या आर्थिक फसवणुकीला अर्थ निरक्षरता कारणीभूत असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. विजय ककडे यांनी केले. विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्रात अर्थशास्त्र विभागाच्या वतीने अर्थ साक्षरता उपक्रमांतर्गत 'वित्तीय साक्षरता व स्वेच्छा निवृत्ती' या विषयावरील आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे होते.

प्रा. डॉ. ककडे म्हणाले, आजच्या काळात आर्थिक निरक्षरतेमुळे नागरिकांची आर्थिक फसवणूक वाढली आहे. शिक्षण साक्षरता, पर्यावरण साक्षरता, संगणक साक्षरता व मोबाइल साक्षरता यापेक्षाही आर्थिक साक्षरता महत्त्वाची आहे. आर्थिक संपत्ती मिळविणे, त्याचा संचय करणे व ती वाढविणे हा प्रत्येकाचा उद्देश असतो, मिळालेल्या संपत्तीचा कसा विनियोग केला याचा हिशोब महत्त्वाचा आहे. आर्थिक नियोजनासाठी आर्थिक शिक्षण तितकेच महत्त्वाचे आहे. ऑनलाइन फसवणुकीचे वाढते प्रकार रोखण्यासाठी प्रत्येकाने आर्थिक सल्लागार नेमला पाहिजे.

आर्थिक प्रवर्तक अनिल पाटील म्हणाले, कोणतीही आर्थिक गुंतवणूक करताना आर्थिक सल्ला घेणे महत्त्वाचे आहे. भविष्यातील आर्थिक गुंतवणुकीसाठी आर्थिक सल्लागाराची भूमिका महत्त्वाची आहे. यावेळी प्रा. डॉ. डी. के. मोरे म्हणाले की, प्रत्येकाने आर्थिक नियोजन केल्यास आपला व कुटुंबाचा भविष्यकाळ चांगला असेल. कोणतीही गुंतवणूक करताना ती योग्य प्रकारे केल्यास कमीतकमी अडचणी येतील. समन्वयक डॉ. के. बी. पाटील यांनी यावेळी प्रास्ताविक केले. डॉ. पी. एन. देवळी यांनी सूत्रसंचालन केले. डी. के. कमलाकर यांनी आभार मानले.

सकाळ




**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात मंगळवारी दूरशिक्षण केंद्रात प्रा. विजय ककडे यांचे विशेष व्याख्यान झाले. या वेळी शेजारी सी. एस. कोतमिरे, डी. के. मोरे उपस्थित होते.

# फसवणूक टाळण्यासाठी आर्थिक साक्षरता महत्त्वाची : प्रा. ककडे

**कोल्हापूर, ता. ३० :** सध्याच्या धावपळीच्या जीवनात नागरिकांची आर्थिक फसवणूक होत आहे. ती टाळण्यासाठी आर्थिक साक्षरता महत्त्वाची आहे, असे मत अर्थशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. विजय ककडे यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रात अर्थशास्त्र विभागातर्फे मंगळवारी अर्थ साक्षरता उपक्रमाअंतर्गत आयोजित 'वित्तीय साक्षरता व स्वेच्छा निवृत्ती' या विषयावरील विशेष व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संचालक प्रा. डी. के. मोरे होते.' आर्थिक प्रवर्तक अनिल पाटील म्हणाले, 'कोणतीही आर्थिक गुंतवणूक करताना आर्थिक सल्ला घेणे महत्वाचे आहे.' प्रा. मोरे म्हणाले, 'प्रत्येकाने आर्थिक नियोजन केल्यास आपला व कुटुंबाचा भविष्यकाळ चांगला असेल.' समन्वयक डॉ. के. बी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. पी. पी. दावणे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. डॉ. पी. एन. देवळी यांनी सूत्रसंचालन केले. डी. के. कमलाकर यांनी आभार मानले.

3 1 MAY 2023 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एकाच दिवशी सापडले ३२ कॉपीबहाद्दर

## पदवी परीक्षा; आतापर्यंत एकूण ८१ जणांवर कारवाई

कोल्हापूर, ता. ३० : शिवाजी विद्यापीठाच्या पदवी अभ्यासक्रमांच्या उन्हाळी सत्रातील परीक्षांमधील कॉपी (गैरमार्गाचा अवलंब) करताना सापडणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसागणिक वाढत आहे. या परीक्षेत मंगळवारी एकाच दिवशी ३२ जणांना कॉपी करताना भरारी पथकाने पकडले. त्यात कोल्हापूर आणि सातारा जिल्ह्यातील प्रत्येकी १६ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. दरम्यान, या परीक्षा सुरू होऊन सहा दिवस पूर्ण झाले आहेत. त्यात आतापर्यंत एकूण ८१ विद्यार्थी कॉपी करताना सापडले आहेत.

बी. ए., कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, बॅचलर ऑफ डिझाईन, बी. कॉम., आर्टस अँड बॅचलर ऑफ एज्युकेशन, इंटेरिअर डिझाईन, आदी विविध १२ पदवी अभ्यासक्रमांच्या परीक्षा ऑफलाईन स्वरूपात मंगळवारी झाल्या. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील एकूण २८,२६४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्या दरम्यान भरारी पथकांनी केलेल्या कारवाईमध्ये कोल्हापूर आणि सातारा जिल्ह्यातील परीक्षा केंद्रांवर एकूण ३२ कॉपी बहाद्दरांना पकडले. त्यांच्यावर परीक्षा प्रमाद समितीकडून विद्यापीठ नियमानुसार कारवाई केली जाणार असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले. परीक्षा मंडळाने कोल्हापूर, सांगली, सातारा या जिल्ह्यासाठी प्रत्येकी सहा भरारी पथके आणि प्रत्येक केंद्रावर एक बैठे पथक तैनात ठेवले आहे.

तरूण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'शास्त्रीय गायन' कार्यशाळेत मार्गदशन करताना गायिका वंदना आठले, चिन्मयी आठले–ओक.

# शिवाजी विद्यापीठात शास्त्रीय गायन कार्यशाळा संपन्न

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्यावतीने सोमवार २९ व ३० मे रोजी दोन दिवसीय 'शास्त्रीय गायन' कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेमध्ये प्रसिध्द शास्त्रीय गायिका वंदना आठले व युवा गायिका चिन्मयी आठले–ओक यांनी शास्त्रीय संगीतातील अहिर भैरव, गावती, हंसध्वनी, बिहाग आदी रागातील विविध बंदिशी, त्यांची गायकी, आकृत्यांची उकल, मुखड्यांचे सौंदर्य, बंदिशीच्या अंगाने रागाची मांडणी, रियाजाच्या पद्धती आदींवर मार्गदर्शन केले. प्रा. प्रशांत देसाई यांनी तबलासाथ केली. डॉ. विनोद ठाकुर–देसाई यांनी प्रास्ताविक केले. अतुल परीट यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. अंजली निगवेकर यांनी स्वागत केले. डॉ. निखिल भगत यांनी आभार मानले. यावेळी अधिविभागतील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.